पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षा कृती कार्यक्रम संचाची निर्मिती व परिणामकारकता एक -अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड पीएच .डी (शिक्षणशास्त्र)

पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

अनकाडे रामा अशोक

मार्गदर्शक

डॉ माने मारुती शिवराम

एम .ए. (मराठी इतिहास अर्थशास्त्र) एम. एड .डी. एस. एम .पीएच .डी

प्राचार्य अध्यापक महाविद्यालय नायगाव

सादर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मार्च -२०२३

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशील	पृष्ठ क्र.
१	प्रास्ताविक	३
२	संशोधनाची गरज	७
३	संशोधनाचे महत्त्व	८
४	संशोधनाची समस्या विधान	९
५	समस्या विधानातील शब्दाच्या कार्यात्मक व्याख्या	९
६	संशोधनाचे गृहितके	१०
७	संशोधनाची उद्दिष्टे	१०
८	परिकल्पना	११
९	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	११
१०	संशोधनाची पद्धती	१२
११	संशोधनाची साधने	१२
१२	संशोधनाचा न्यादर्श	१२
१३	न्यादर्श निवड पद्धत	१२
१४	सांख्यिकीय परिमाण	१३
१५	कार्यवाहीचे टप्पे	१३
१६	वेळापत्रक	१३
१७	अंदाजपत्रक	१४
१८	संदर्भ ग्रंथ सूची	१४,,१५

१. प्रस्ताविक

21 व्या शतकात जगतीने प्रगती करीत आहे. म्हणून सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे .म्हणून जगातील विकसित देशाचा विकास शिक्षणाच्या मार्फत झाला मानवी संसाधन विकासासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. राष्ट्रीय विकास करायचा असेल तर भौतिक साधन संपत्तीपेक्षा सर्वात महत्त्वाची साधन संपत्ती म्हणजे मानव ज्याप्रमाणे कोणत्याही इमारतीचा पाया मजबूत असल्याशिवाय ही इमारत मजबूत असू शकत नाही.

त्याचप्रमाणे माणूस व शिक्षण या दोन्ही बाजू विकसित झाल्याशिवाय राष्ट्रीय विकास होऊ शकत नाही. मानव संसाधन विकासासाठी विविध कार्यक्षेत्र पहावयास मिळतात उदाहरणात शैक्षणिक, वैज्ञानिक, आर्थिक, धार्मिक ,सामाजिक, व्यावसायिक, सांस्कृतिक ,इत्यादी. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. उत्कृष्ट नागरिक हा शिक्षणाच्या माध्यमातून घडवता येतो. भावी पिढी ही सक्षम घडविण्यास शिक्षण हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. शिक्षणाच्या माध्यमातून उत्कृष्ट नागरिक निर्माण करता येतो .म्हणून भावी सक्षम नागरिक घडविण्यासाठी शिक्षण मदत करत असते .त्यामुळेच शिक्षणाचा पाया मजबूत असणे आवश्यक आहे. म्हणून याची सुरुवात प्राथमिक शिक्षणापासून करणे आवश्यक आहे.

शिक्षणाचा पाया म्हणून प्राथमिक शिक्षणाकडे पाहिली जाते म्हणूनच भारतीय राज्यघटनेमध्ये वय वर्ष ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे व सार्वत्रिक शिक्षण अनिवार्य केले आहे. ब्रिटिशांच्या काळामध्ये शिक्षणाचा विकास पाहिजे तेवढा झाला नाही कारण पाश्चिमात्य संस्कृतीचा आपल्या शिक्षण पद्धतीवर खूप प्रभाव पडला होता. त्यावेळीच्या शिक्षणाचे महत्त्वाचा उद्देश हे नोकरदार बनविण्याचे शिक्षण होते. परंतु सक्षम नागरिक बनण्याचे शिक्षण नव्हते म्हणून स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शिक्षणासाठी विविध उपाय योजना करण्यासाठी आयोग व समित्यांची निर्मिती करण्यात आली.

४ नोव्हेंबर १९४८ साली डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळांनी राधाकृष्णन आयोगाची शिफारस केली. या आयोगाचा मुख्य उद्देश उच्च शिक्षण व माध्यमिक शिक्षण यांची पुनर्रचना करण्यासाठी स्थापन केला होता. स्वातंत्र्यानंतरचा पहिला आयोग होता. या आयोगा च्या मुख्य शिफारशी या मातृभाषेतून शिक्षण देण्याला महत्त्व

देणे. तसेच स्त्री शिक्षणावर भर देणे. आणि भारतीय संस्कृतीचे संवर्धन यावर मोठ्या प्रमाणात या आयोगाने भर दिला होता.

१९५२-१९५३ साली डॉ. अलादी लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली मुदलीयार आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने पुढील बाबींवर भर दिला. शालेय शिक्षणाचा कालावधी १२ वर्षा वरून ११ वर्षांवर आणण्याची शिफारस केली. तसेच बहुउद्देशीय शाळांची शिफारस सूचना झाली विद्यार्थ्यांसाठी परीक्षा व्यक्तीनिष्ठ नसाव्या तर वस्तुनिष्ठ असाव्यात. गुणां ऐवजी श्रेणी द्यावी मातृभाषेतून शिक्षण असावं.

स्त्री शिक्षणासाठी १९५८ साली स्त्री शिक्षणासाठी पहिला महत्त्वाचा आयोग स्थापन झाला त्यावेळी सरोजिनी बाबर या आयोगाच्या सचिव होत्या या आयोगाने स्त्री शिक्षणासाठी विविध शिफारशी केल्या त्यामध्ये स्वतंत्र स्त्री शिक्षण विभाग, स्त्री शिक्षण समिती नेमावी शिक्षिकांना प्रशिक्षण द्यावे स्त्रियांसाठी व्यवसाय शिक्षण द्यावे.

१९६४-१९६६ साली डॉ. डी. एस .कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली कोठारी आयोग स्थापन केला. या आयोगामध्ये शैक्षणिक विस्तार व गुणवत्ता यावर भर दिला होता .डॉ. कोठारी यांच्या मते देशाचे भवितव्य हे वर्गा वर्गातून घडत असते त्यामुळे शिक्षणातून देशाचा विचार या वाक्यात सुसंगत अशा खूप शिफारशी केल्या. यामध्ये त्रिभाषा सूत्र .शालेय शिक्षणाचे मातृभाषा हे माध्यम. आश्रम शाळांची संख्या वाढवावी स्त्री विभाग स्वतंत्र असावा पदवीपर्यंत मात्रभाषेतून शिक्षण व पदवीत्तर शिक्षण इंग्रजीत द्यावे .रात्र महाविद्यालय सुरू करावे .शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे विद्यापीठाच्या संख्येत वाढ करावी शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे. काही महाविद्यालयांना स्वायत्तता द्यावी .विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढवावे .यासाठी विविध शिफारशी केल्या. प्राथमिक शाळेत पुस्तके व साहित्य मोफत द्यावेत. पुस्तक पेढी योजना सुरू करावी. श्रम शिबिर व समाजसेवा कार्यक्रम सुरू करून बालकांचा सामाजिक विकास साधावा. आदिवासी मुलांसाठी वस्तीग्रह सुरू करावे विद्यार्थी कल्याण योजना राबवावी सर्व स्तरावर विज्ञान विषयाला महत्त्व द्यावे. विद्यार्थी संख्या विचारात घेऊन वर्गखोल्या असाव्यात समाजाच्या गरजेनुसार पाठ्यक्रम असावा यानुसार पाठ्यपुस्तक तयार करावीत . डॉ.कोठारी यांनीच १०+३+३ हा आकृतीबंध तयार केला.

१९६८ साली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण डॉ. त्रिगुणा सेन यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची स्थापना झाली या धोरणानुसार अनेक सुधारणा सुचविण्यात आल्या यामध्ये मूल्यमापन पद्धतीत सुधारणा करावी . प्राथमिक शाळा मध्ये गळती व नापासाचे प्रमाण कमी करण्यासाठी कार्यक्रमाची आखणी पाठ्यपुस्तकाचा गुणात्मक विकासावर भर माध्यमिक शाळांना पाचवी ते सातवीचे वर्ग जोडावेत प्रत्येक बालकांना चालत जाता येईल एवढ्या अंतरावर प्राथमिक शाळा असावी.

१९८४ साली शालेय सुधार समितीची स्थापना ही महाराष्ट्राच्या संदर्भात होती ही पार्वतीबाई मलगोंडा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती .या समितीत पुढील सूचना सुचविल्या होत्या. यामध्ये मधल्या वेळेत जेवण योजना, बालवाड्या प्राथमिक शाळांना जोडाव्यात, तसेच शिक्षक प्रशिक्षित असावेत आणि तीन किलोमीटरच्या आत प्राथमिक शाळा असावी.

१९८६ साली राजीव गांधी यांच्या अध्यक्षतेखाली हे धोरण जाहीर झालं या धोरणात महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या गेल्या. त्यामध्ये नवोदय विद्यालयांची स्थापना उच्च शिक्षणात सर्वांना समान संधी शिक्षणाच्या गुणात्मक विकासावर भर मुक्त विद्यापीठ प्रणाली प्रौढ व निरंतर कार्यक्रमावर भर स्त्री शिक्षणावर भर प्राथमिक स्तरावर कृषीप्रधान शिक्षण पद्धती खडू फळा मोहीम शिक्षणाचे सार्वत्रिकरण शालेय गळतीचे प्रमाण कमी करणे ६ ते १४ वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण. माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षणावर भर शिक्षणाचे खाजगीकरण इत्यादी शिफारशी सुचविल्या होत्या.

व्यक्ती विकासात व देशाच्या विकासामध्ये शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे म्हणून शिक्षण हा मानवाच्या प्रगतीतील महत्त्वाचा घटक आहे.

भारतीय शिक्षण तज्ञ तसेच महान राजकीय नेते महात्मा गांधी यांच्या मते शिक्षण म्हणजे "माणसाचे शरीर मन आणि आत्मा यांच्यातील सर्वोत्कृष्ट चित्र"

भारतीय विचारवंत स्वामी विवेकानंदाच्या मते" माणसात असलेल्या परिपूर्णतेचे प्रकटीकरण म्हणजेच शिक्षण"

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते" शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही."

महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व पुढीलप्रमाणे विशद केले आहे.

" विद्येविना मती गेली | मतीविना नीती गेली |

नीतीविना गती गेली | गती विना वित्त गेले |

वित्त विना शूद्र खचले | इतके अनर्थ एका अविद्येने केले" ||

वरील सर्व विचारवंताच्या विचारातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की शिक्षण हे मानवी जीवनाला दिशा देण्यासाठी. देशाच्या विकासासाठी आणि स्पर्धेतील युगामध्ये जगामध्ये सातत्य टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वाचं घटक आहे.

प्राथमिक व माध्यमिक शाळांतील गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्याची योजना सन १९५४-१९५५ पासून कार्यान्वित आहे सदर शिष्यवृत्ती योजनेत केंद्र शासनाच्या बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार या कायद्यामधील तरतुदी लक्षात घेऊन २९/०६/२०१५ च्या शासन निर्णयाने च्या शासन निर्णय राज्यात कार्यान्वित असलेल्या शिष्यवृत्तीचा स्तर इयत्ता ४ ऐवजी इयत्ता ५ व इयत्ता ७ ऐवजी इयत्ता ८ असा करण्यात आला आहे.

सदरील शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन सन २०१६- २०१७ पासून इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी असे नियमितपणे करण्यात आले आहे. महाराष्ट्रामध्ये सदर परीक्षा ही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्रामध्ये सदर परीक्षा ही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात येते. सदर परीक्षेसाठी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा या दोन स्तरावर घेण्यात येते. सदरील परीक्षेसाठी शासनमान्य शासकीय /अनुदानित /विनाअनुदानित /कायम विनाअनुदानित/ स्वयअर्थसाहित /शाळांमधील विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती परीक्षा देण्यास पात्र असतात.

आयसीएसई व सीबीएसई अभ्यासक्रम राबवणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती परीक्षेत प्रविष्ट होण्यासाठी खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत असते.

१. सदर परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित केलेल्या वयाची अट राहील.

२. सदर विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती परीक्षेत या शासन निर्णयाने सुधारित विथ शिल्पा करण्यात येईल.

३. सदर विद्यार्थ्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार केली जाते.

४. सदर विद्यार्थी गुणवत्ता यादीत आल्यास पहिल्या पन्नास विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते व गुन्हा अनुक्रम कळविण्यात येतो मात्र त्यांना शिष्यवृत्तीची रोक रक्कम दिली जात नाही.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या अधिपत्याखाली शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. यामध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना १०० रु प्रतिमाह प्रमाणे पुढील तीन वर्ष शिष्यवृत्ती दिली जाते. व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना १५० रु प्रतिमाह प्रमाणे पुढील दोन वर्ष शिष्यवृत्ती दिली जाते.

याप्रमाणे पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेचे शालेय स्तरापासूनच स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण होण्याच्या अनुषंगाने सदरील परीक्षेचे आयोजन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत दरवर्षी केल्या जाते.

सदरील परीक्षा ही ग्रामीण भागातील गोरगरीब तसेच होतकरू विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरली आहे. परंतु या परीक्षेच्या संदर्भामध्ये विद्यार्थ्यांचे पात्र होण्याचे प्रमाण कमी असून या योजनेचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणामध्ये होणे गरजेचे आहे तसेच सदरील परीक्षेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थी पात्र होण्यासाठी निश्चित अशा प्रकारच्या एका कृती कार्यक्रमची आवश्यकता वाटते म्हणून सदरील विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे.

2. संशोधनाची गरज

संशोधनाचे मुख्य भूमिका ही पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षे साठी विद्यार्थ्यांची सध्या स्थितीचा अभ्यास करणे आणि सदरील परीक्षा ही विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगामध्ये प्रवेश करण्यासाठीचे एक मूलभूत अशी परीक्षा असून संबंधित परीक्षेचे शालेय स्तरावरील सद्यस्थितीमध्ये होणारी अंमलबजावणी आणि संबंधित शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्याला पात्र होण्यासाठी येणाऱ्या अडचणी समजून घेणे.

हा विषय निवडण्यामागील प्रेरणा अशी आहे की पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर स्पर्धात्मक तयारी होण्यासाठी अतिशय महत्त्वाची परीक्षा आहे या परीक्षेच्या माध्यमातून पात्र विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत मिळते व स्पर्धकात्मक परीक्षेतील मूलभूत ज्ञान संबंधित परीक्षेच्या तयारीमुळे मिळते म्हणून मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा आयोजना बाबतीत शासनाचा उद्देश व तो उद्देश साध्य होण्यासाठी शासनाचे अपेक्षित ध्येय साध्य होते आहे का जाणून घेता येईल तसेच संबंधित परीक्षेच्या तयारीसाठीचे येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून संबंधित परीक्षेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी पात्र होण्यासाठी कृती कार्यक्रमाचा आराखडा तयार करून मोठ्या प्रमाणामध्ये विद्यार्थी पात्र होण्यासाठी सदरील संशोधन गरजेचे आहे.

३. संशोधनाचे महत्त्व

1) पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षा शालेय जीवनातील महत्त्वाची स्पर्धात्मक परीक्षा आहे

2) प्रस्तुत संशोधनामुळे पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षेतील अडचणी समजून घेण्यास मदत होईल .

3) प्रस्तुत संशोधनामुळे पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील अंमलबजावणीतील अडचणी जाणून घेण्यास मदत होईल.

4) सदरील संशोधनामुळे सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा एक वरदान ठरू शकते यातून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती मधून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च पूर्ण होऊ शकतो .

5) संशोधक स्वतः शालेय स्तरावर अध्यापनाचे काम करत असल्यामुळे ही परिस्थिती लक्षात आली म्हणून विद्यार्थी जीवनामध्ये शिष्यवृत्ती परीक्षेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे लक्षात आले.

6) सदरील संशोधनामुळे विद्यार्थ्यांना निश्चित असा कृती कार्यक्रम आराखडा देऊन त्याची परिणाम करतात पण त्यास मदत होईल .

7) सदरील संशोधनामुळे पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये विद्यार्थी पात्र ठरविण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे आहे.

8) प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांना स्वय अध्ययनाचे प्रेरणा निर्माण स्वय अध्ययनाची प्रेरणा निर्माण होते.

9) प्रस्तुत संशोधनामुळे पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक परीक्षा विषयी विद्यार्थ्यांच्या मनात आवड निर्माण होते.

या दृष्टीने प्रस्तुत संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

४. संशोधनाचे समस्या विधान

पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षा कृती कार्यक्रम संचाची निर्मिती व परिणामकारकता एक अभ्यास.

५. समस्या विधानातील महत्त्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या

१. उच्च प्राथमिक - ज्या स्तरावर विद्यार्थी शाळेत इयत्ता सहावी ते आठवीचे वर्गाचे शिक्षण घेतात त्या स्तराला उच्च प्राथमिक स्तर असे म्हणतात.

२. पूर्व उच्च प्राथमिक - इयत्ता पाचवीत शिक्षण घेत असलेले विद्यार्थी होय .

३. पूर्व माध्यमिक - इयत्ता आठवी वर्गात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी होय

४. कृती कार्यक्रम संच- पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षेसाठी तयार केलेला आराखडा

५. परिणामकारकता- कृती कार्यक्रम संचाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये घडून आलेला बदल

६. संशोधनाची गृहितके

१. पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या क्षमतेत कृती कार्यक्रम च्या माध्यमातून वाढ करता येते

२. पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा कृती कार्यक्रम सध्या स्थितीत अवलंबलेल्या पद्धतीत त्रुटी त्रुटी आढळतात.

३. पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत कृती कार्यक्रम संचाच्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर झालेली परिणामकारकता तपासणे शक्य आहे.

७. संशोधनाची उद्दिष्टे

१. पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती स्तरावरील परीक्षांचा विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा अभ्यास करणे.

२. पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती स्तरावरील परीक्षांच्या सद्यस्थितीतील कृती कार्यक्रमांचा अभ्यास करणे.

३. पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षेचा कृती कार्यक्रम संच निर्मिती करणे.

४. पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षेच्या कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

५. पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षेच्या कृती कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

८. परिकल्पना

१. . संशोधन परिकल्पना- पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षा कृती कार्यक्रम संच निर्मितीच्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या संपदात इष्ट बदल होईल.

२. पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा संदर्भातील संपादन गुणाकांत कृती कार्यक्रम संचाचा परिणाम होतो.

९. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संशोधनाची व्याप्ती-

१. प्रस्तुत संशोधन हे पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या विद्यार्थ्यासाठीच आहे.

२. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या मराठी माध्यमाच्या सर्व विद्यार्थ्यांना लागू पडतील.

.

संशोधनाच्या परिमर्यादा

१. प्रस्तुत संशोधन हे नायगाव तालुक्यातील पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा मराठी माध्यमाच्या वर्गापुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन शिष्यवृत्ती परीक्षेतील विद्यार्थ्यापुरतेच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांचे लिंग, सामाजिक ,आर्थिक व बौद्धिक स्तर याचा विचार केला गेला नाही.

४. प्रस्तुत संशोधन हे पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या निवडक घटकांवर आधारित आहे.

५. प्रस्तुत संशोधनात फक्त निवडलेल्या घटकांमधूनच साध्य होणाऱ्या घटकांचा विचार केला गेला आहे.

संशोधनाच्या मर्यादा

१. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष शिष्यवृत्ती परीक्षा कृती कार्यक्रम संच निर्मितीच्या दृष्टीने तयार केलेल्या चाचणीवरून संकलित केलेल्या माहितीच्या आधारावर आहेत.

२.प्रस्तुत संशोधन हे फक्त मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांपुरतीच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक वर्ष २०२३-२०२५ या कालावधी कृती मर्यादित आहे

१०. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी मिश्रसंशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल

१) सर्वेक्षण पद्धती

२) प्रयोग संशोधन पद्धती

३) साधन निर्मिती संशोधन पद्धती

११. संशोधनाची साधने

प्रस्तु संशोधनात माहिती संकलनासाठी विविध साधनांचा वापर केला जाईल.

१) प्रश्नावली

२) सर्वेक्षण

३) मुलाखत

४ पूर्व चाचणी

५) उत्तर चाचणी

१२. न्यादर्श

प्रस्तुत संशोधनात नायगाव तालुक्यातील शाळांचा समावेश आहे .

१३. न्यादर्श निवड

प्रस्तुत संशोधनाचा नमुना निवडण्यासाठी सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येईल.

१४ . सांख्यिकीय परिमाण

प्रस्तुत संशोधनाच्या संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढण्यासाठी वारंवारता सारणी शेकडेवारी आलेख इत्यादी सांख्यिकीय परिमाणाचा वापर करण्यात येईल.

१५. कार्यवाहीचे टप्पे

प्रस्तुत संशोधनात एकूण पाच प्रकरणाची योजना करण्यात आली आहे ती पुढील प्रमाणे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - संबंधित साहित्य व गत संशोधनाचा आढावा

प्रकरण तिसरे - संशोधनाची कार्यवाही

प्रकरण चौथे - माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे - निष्कर्ष व शिफारशी

१६. संशोधनाची वेळापत्रक

कोणतेही संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी नियोजित वेळापत्रक आवश्यक असते . सदरील संशोधन कार्यासाठी वेळापत्रक पुढील प्रमाणे असेल.

अ.क्र.	कार्यवाहीचा तपशील.	कालावधी
१.	संशोधन आराखडा सादरीकरण.	मार्च -२०२३
२.	विषयासंबंधी सखोल वाचन.	मे ते सप्टेंबर -२०२३
३.	संशोधन साहित्य निर्मिती व अभ्यास.	ऑक्टोंबर -२०२३
४.	प्रत्यक्ष कार्यवाही	जानेवारी २०२४ ते सप्टेंबर २०२४

५.	सांख्यिकीय प्रक्रिया व अर्थनिर्वचन निष्कर्ष. व शिफारशी सुचविणे	जानेवारी-२०२५
६.	अहवाल लेखन व छपाई.	मार्च २०२५
७.	अहवाल बांधणी	एप्रिल २०२५.
८.	अहवाल सादरीकरण.	मे २०२५

१७. अंदाज पत्रक

अ. क्र.	खर्चाचा तपशील.	अंदाजे खर्च
१.	संशोधन आराखडा तयार करणे	३०००
२.	ग्रंथ व इतर साहित्य.	५०००
३.	संशोधन साधन निर्मिती	९००
४.	प्रत्यक्ष संशोधन कार्यवाही	११००
५.	संशोधन प्रवास खर्च.	१२०००
६.	अहवाल छपाई व झेरॉक्स.	१००००
७.	अहवाल बांधणी	४०००
	एकूण.	३६०००

१८. संदर्भ ग्रंथ सूची

१. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे वेबसाईट

२. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा केंद्र संचालक पुस्तिका.

३ .शिक्षण संक्रमण मासिक

४. विकासपीडिया

५ भिंताडे वि.रा .(२००७)शैक्षणिक संशोधन पद्धती नूतन प्रकाशन पुणे.

६. मुळे रा .शा. उमाटे वि.तु (१९९८)शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, विद्या प्रकाशन औरंगाबाद.

१९. Biblography

१.http://me.vikaspedia in education

२.http;//hdl.handle.net/10603/175113

३.http://shodeganga.inflibnet.as.in

४. http://.mscepune

५.http://shodgangotri.and mi net.as.in

संशोधक — मार्गदर्शक

अनकाडे रामा अशोक — डॉ. माने मारुती शिवराम